# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/E/०००८३**

**अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
मुख्य सचिव कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
गृह विभाग, ०२ रा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव**
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, विस्तार इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. १८.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.१०.२०२३ | ०६.११.२०२३ | २८.११.२०२३ | २८.१२.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०४.०४.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०६.११.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २८.१२.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २८.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार अर्जदार यांनी मुख्य सचिव कार्यालयास दि. १७.१०.२०२३ रोजीच्या ईमेलवर करण्यात आलेल्या कार्यवाहीविषयी विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. ०६.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, त्यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३) अन्वये हस्तांतरित करण्यात आलेला आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने दि. २८.११.२०२३ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेले उत्तर समर्पक आहे असे आदेशित करुन प्रथम अपिल निकाली काढलेले आहे.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त असून कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थी यांना विहित मुदतीत उत्तर देण्यात आले होते. अपिलार्थी यांचा माहिती अर्ज गृह विभाग यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन प्रथम अपिल निकाली काढलेले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**मुंबई**
**दिनांक : ०१.०७.२०२५**

1-7-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**